# राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

द्वारा श्री. अनिल व्यास, अ/१, केशर सोसायटी, पौड रोड, पुणे - ४११ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४६ ४६ ६१. दूरभ्रमण भाष : ९४२२३-६६७१४

## तपपूर्ती समारंभ

(स्थापना-१४ ऑगस्ट १९९५)

**अध्यक्ष**
श्री. मोहनराव घैसास

**उपाध्यक्ष**
श्री. श्रीकांत गोगटे

**कोषाध्यक्ष**
श्री. कुमार आठवले

**कार्यवाह**
श्री. अनिल व्यास

**सदस्य**
सौ. पूनम मेहता
सौ. बीना सप्रे
श्री. मिलिंद देशपांडे
डॉ. द. र. बापट
डॉ. अनिल पत्की
श्री. बाळासाहेब गायकवाड

दि. ८ फेब्रु २००८

### भरे ते तैवान

पुणे हे विद्येचे माहेरघर समजले जाते. परंतू शहरापासून १५-२० कि.मी. दूर गेल्यावर खेड्यापाड्यातून शिक्षणाची किती दुरावस्था आहे हे प्रत्यक्ष प्रवासातूनच लक्षात येऊ शकते.

असाच प्रवास मुळशी तालुक्यात करत असताना असे लक्षात आले की मुळशी तालुका हिंजवडी आय.टी.पार्क, पिरंगुट चे औद्योगिक क्षेत्र, सहारा सिटी, लवासा, महिंद्र चे जागतिक महाविद्यालय व रिव्हरडेल आंतरराष्ट्रीय शाळा अशा भव्य विकासाभिमूख प्रकारांनी एका बाजूस नटला आहे. तर पश्चिम घाट, मुळशी धरण, टेमघर धरण व नैसर्गिक सौंदर्यानेही शहरवासींचा आकर्षित करणारा ठरला आहे.

१०-१२ वर्षापूर्वी मुळशीतील रस्ते रोज जाणे येणे करण्यासाठी सोयीचे नव्हते. १० वीच्या पुढील शिक्षणासाठी पिरंगुट व पौड अशी दोन कनिष्ठ महाविद्यालये होती. या विद्यार्थ्यांना आपल्या डोंगरद-यातील घरातुन मुख्य रस्त्यावर चालत यावे लागे. तेथून एसटीने पिरंगुट-पौडला येणे असा रोज २ ते ३ तासांचा प्रवास करावा लागे. ही गैरसोय दूर करण्याच्या हेतुने 'श्री प्रतिष्ठानच्या' माध्यमातून एक वसतिगृह पिरंगुट येथे सुरु करण्याचा निर्णय १९९६ साली घेण्यात आला.

पहिल्या वर्षी राजेश कुचेकर, महेश मोहोळ असे चार विद्यार्थी वसतिगृहात दाखल झाले. नंतर ही संख्या ८-१०विद्यार्थ्यांपर्यंत वाढत गेली. या विद्यार्थ्यांनी एक ठराविक दिनक्रम पाळावा. त्यात सकाळी प्रार्थना-व्यायाम-अभ्यास व संध्याकाळी एक तास श्रमदान नंतर खेळ अभ्यास व इतर वाचन अशा तासिका ठरविण्यात आल्या होत्या. त्यानुसार विद्यार्थी स्वयंशिस्तीने सर्व दिनक्रम पार पाडत असत. याच बरोबर वर्षभर वेगवेगळे संस्कार करणारे विविध उपक्रम राबवले जात असत. उदा. जानेवारीत संक्रातीच्या सणानिमित्ताने जोर स्पर्धा व त्यानंतर मोहन शेटे यांचा शिवचरित्र कथनाचा कार्यक्रम, फेब्रुवारी-मार्चमध्ये सहल, एप्रिलमध्ये आंबेडकर जयंती, दिवाळीत विद्यार्थ्यांच्या घरी प्रवास, डिसेंबरमध्ये विजय दिन, पावसाळ्यात वर्षा सहल, वृक्ष लागवड अशा उपक्रमातून या विद्यार्थ्यावर चांगल्या विचारांचे संस्कार होत असत. वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यानी स्वयंस्फूर्तीने एखादा सामाजिक उपक्रम राबवावा असाही आग्रह धरला जात होता. याच वसतिगृहाचे पुढचे पाऊल म्हणून विद्यार्थ्यांची पदवी पर्यंतच्या शिक्षणाची सोय पुण्यात करण्यात येत असे. त्यातून ही गरजु मुले पदवी व पदवीत्तर शिक्षण घेऊन चांगल्यापैकी स्थिरस्थावर होत आहेत.

सुरूवातीपासूनच त्यांनी उच्च शिक्षण घेतल्यावरही आपल्याच गावी राहून चांगले जीवन जगावे व इतरांना सहाय्य करावे असा विचार त्यांच्या समोर मांडला जात होता. आज असे लक्षात येते की सुरूवातीच्या ४-५ वर्षातील सर्व विद्यार्थी उच्चशिक्षित आहेत व आपल्याच गावात राहुन योग्य ती नोकरी करत आहेत व सामाजिक कार्यात सहभागी होत आहेत. असे १२-१५ माजी विद्यार्थी महिन्यातून एकदा एकत्र येतात व कामाची दिशा ठरवतात. त्याप्रमाणे सामाजिक जाणीव ठेवून कार्य करतात.

यातील काही उदाहरणे आवर्जून देण्यासारखी आहेत. श्री महेश मोहोळ हा विद्यार्थी एम.ए. डी.एड. शिक्षण घेऊन स्वामी विवेकानंद विद्यालय असदे या शाळेत शिक्षक आहे व सामाजिक कामात व्यग्र असतो. श्री रमेश अदमाने हा बी.एस.सी. झालेला आदगावचा विद्यार्थी १ १/२ वर्षे लातूर मधील कलदेव लिंबाळा या गावी सेवाव्रती म्हणून कार्यरत होता व आता नोकरीत स्थिरस्थावर होऊन संस्थेचे काम करत आहे.

बोतरवाडीचा श्री शेखर मोकर हा विद्यार्थी एम.ए. भूगोल पर्यंत शिक्षण घेऊन मुळशी तालुक्यात व सुयश ट्रस्टच्या माध्यमातून पुणे व रायगड जिल्ह्यात शेतक-याना चांगली शेती शिकवण्याचे धडे देत आहे. केसवडवाडी घोटावडे येथील संतोष केसवड हा विद्यार्थी हिंजवडीत इलेक्ट्रीक क्षेत्रात नोकरी करत आहे. संस्थेच्या धान्य संकलन योजनेत दर महिन्याच्या १० तारखेस सहभागी होत आहे. त्याने गावात एक महिला बचत गट ही स्थापन करून चांगल्या रितीने ते चालवत आहे.

भरेगावचा आझम शेख हा विद्यार्थी भारतीय विद्यापीठातून रसायन शास्त्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. नंतर एम.एस.सी. पर्यंत शिक्षण घेऊन स.प. महाविद्यालयात व्याख्याता म्हणून नोकरी करत असताना पी.एच.डी.साठी प्रवेश मिळवला व गेली दोन वर्षे तैवान येथे संशोधन करत आहे. विशेष म्हणजे तेथे ही ८० विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक व भारतीय संस्कृतीचा प्रचार करत आहे. योग्य संधी मिळाल्यावर विद्यार्थी कसे पुढे जातात व जाणीव ठेवून कार्यरत राहतात याची ही उत्तम उदाहरणे आहेत.

सौ. बीना सप्रे,
प्रसिद्धी प्रमुख, (९८२२०४६६९६)